पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक -३

सभावृत्तांत

दिनांक :- २०.४.२०१२ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.४.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे महापौर
२. मा.राजू मिसाळ उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर

१७. मा.जगदीश शेट्टी

१८. मा.बाबर शारदा प्रकाश

१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

२०. मा.सौ.मंगलताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.लोंढे गणेश नारायण

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे

४७. मा.पवार मनीषा काळूराम

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.अविनाश (दादा) टेकावडे

५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५४. मा.वाबळे संजय मल्हारराव

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६३. मा.महेशदादा किसन लांडगे

६४. मा.फुगे सीमा दत्तात्रय

६५. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

८१. मा.आसवाणी सविता धनराज

८२. मा.वाघेरे सुनिता राजेश

८३. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम

८४. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

८५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८७. मा.काळे विमल रमेश

८८. मा.पाडाळे निता विलास

८९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

९०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९१. मा.विमलताई सुरेश जगताप

९२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९३. मा.बारणे निलेश हिरामण

९४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

९६. मा.बारणे माया संतोष

९७. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

१००.मा.कलाटे स्वाती मयुर

१०१.मा.नांदगुडे विलास एकनाथ

१०२.मा.चौंधे आरती सुरेश

१०३.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०५.मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०६.मा.जवळकर वैशाली राहुल

१०७.मा.जगताप राजेंद्र गणपत

१०८.मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०९.मा.जगताप नवनाथ दत्तु

११०.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१११.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११२.मा.जम सोनाली पोपट

११३.मा.प्रशांत शितोळे

११४.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११५.मा.काटे रोहित अप्पा सुदाम

११६.मा.गायकवाड संध्या सुरदास

११७.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११८.मा.शेंडगे आशा सुखदेव

११९.मा.मोटे किरण बाळासाहेब

१२०.मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१२१. मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.मुंढे, मा.टेकाळे,मा.पवार,मा.दुरगूडे-सहा. आयुक्त, मा.काळे-नगरसचिव,मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.काची-उपशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.अय्यर-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.निकम,मा.इंगळे,मा.पाटील,मा.जाधव,मा.कपिले,मा.साळवी,मा.लडकत , मा.चौधरी,मा.पिरजादे,मा.पठाण-कार्य.अभियंता,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.ओव्हाळ-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी, मा.माछरे-विशेष अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत सभा कामकाजाला सुरवात करणेत येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ नुसार महापालिका विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत क्षेत्राचा मोबदला अदा न करता केलेल्या विकास कामाचे क्षेत्राचा मोबदला अदा करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९२ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

(क्रिकेटपट्टु हरी सावंत यांचा विशेष कामगिरी बद्यल सत्कार करणेत आला.)

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आपल्या परवानगीने सभागृहाचे लक्ष एका विषयाकडे वेधू इच्छितो. गेली दोन दिवस पिंपळेगुरव याठिकाणी महापालिकेच्या अतिक्रमण खात्याच्या वतीने सर्वसामान्य नागरीकांच्या घरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे ज्या घरांवर कार्यवाही करण्यात आली आहे ती घरे गुंठेवारी कायद्यानुसार नियमित करण्यात आलेली होती. जर आरक्षणामध्ये ते घर होते तर गुंठेवारी कायद्यानुसार त्या घराची गुंठेवारी का करण्यात आली होती याचे उत्तर दिले पाहिजे. गुंठेवारीच्या कायद्यानुसार कुठलेही बांधकाम हे रिझर्व्हेशनच्या जागेत असेल किंवा आवश्यक प्रकल्पासाठी महापालिकेच्या डीपीमध्ये असलेल्या रिझर्व्हेशनमध्ये बाधीत असलेल्या जागेवरील असेलतर ते नियमित करता येत नाही. श्री.सोनवणे व श्री.तांबोळी या नागरीकांची घरे पाडण्यात आली आहेत परंतु या दोघाकडे हे बांधकाम गुंठेवारीमध्ये केल्याचे पुरावे आहेत, ते बांधकाम पाडण्यात आलेले आहे. नागरीकांवर अन्याय झालेला आहे. हे बांधकाम चालू होते त्यावेळेस महापालिकेचे अधिकारी झोपले होते का. महापालिकेच्या क्षेत्रामध्ये ९३२६०

अनाधिकृत मिळकतीना नोटिसा दिलेल्या आहेत. काही भागामध्ये या नोटिसा वाटलेल्या आहेत व काही भागामध्ये नोटिसा देण्याचे काम चालू आहे. जवळपास ३० ते ४० हजार मिळकतीच्या आज सुध्दा करसंकलन विभागामध्ये नोंदी नाहीत. सगळयाचा विचार केलातर १ लाख ४० हजार अनाधिकृत मिळकती या महापालिका क्षेत्रामध्ये आहेत त्यापैकी ब-याचशा मिळकती महापालिकेच्या रिझर्व्हेशनच्या जागेमध्ये बांधकाम केलेल्या आहेत परंतु ते रिझर्व्हेशन आजपर्यंत महापालिकेनी ताब्यात घेतलेले नाही. एखादी निवीदा काढताना पुर्ण जागा महापालिकेच्या ताब्यात असली पाहिजे. नाटयगृहाची जागा तुमच्या ताब्यात नव्हती हे नंतर तुमच्या लक्षात आलेले आहे. सदरची जागा ताब्यात घेत असताना त्याठिकाणी राहणा-या नागरीकांवर अन्याय केलेला आहे. प्रामुख्याने ज्या नागरीकांची घरे पाडलेली आहेत ते गोरगरीब नागरीक होते. ज्यांना राजकीय वाली कोणीही नव्हता, अशा गरीब नागरीकांना रस्त्यावर आणण्याचे काम महापालिकेच्या अधिका-यांनी केलेले आहे. अशाप्रकारचे बांधकाम होत असतानाच ते थांबविले असतेतर त्यांचे हे हाल झाले नसते. त्या नागरीकांना त्यांचा संसार सुध्दा काढू दिलेला नाही, जीवनावश्यक वस्तू सुध्दा काढू दिलेल्या नाहीत. त्यांच्या संसाराची पुर्णपणे विल्हेवाट लावण्याचे काम महापालिकेच्या अधिका-यांनी संगनमताने केलेले आहे. अशाप्रकारची कार्यवाही विशीष्ठ नागरीकांना डोळयापुढे ठेवून होते. तेथील नागरीकांवर अन्याय झालेला आहे त्यांना न्याय देण्याचे काम आपण केले पाहिजे. आपण एकिकडे सांगतो आम्ही गोरगरीबांना घरे देतो, सहा हजार घरांचा प्रकल्प राबवितो. या राज्यामध्ये एकमेव महापालिका आहे की ती गोरगरीबांसाठी घर देते. पहिले १ लाखात होते नंतर ३ लाख ७५ हजार झाले आहेत आणि दुसरीकडे सर्वसामान्य माणसाना रस्त्यावर आणण्याचे काम आपल्याकडून होते आहे हि दुर्दैवी गोष्ट आहे. आज सुध्दा शहरात मोठया प्रमाणात बांधकामे चालू आहेत. यामध्ये नागरीकांना वेळीच दक्षता घ्यायला लावली असतीतर त्यांचा संसार रस्त्यावर आला नसता. एकीकडे कोटयावधीच्या योजना राबवितो व दुसरीकडे गोरगरीबांच्या घरावर नांगर फिरवितो. औचित्याचा मुद्दा म्हणून ही गोष्ट तुमच्या लक्षात आणतो. आपण आदेश दिलेतर हे गुंठेवारी कायद्यानुसार बांधकाम का केले गेले हा खुलासा होईल संबंधीतावर, दोषीवर कारवाई करावी. ज्या नागरीकांना रस्त्यावर आणण्याचे काम केले आहे त्यांना न्याय देण्याचे काम आपण करावे. त्याठिकाणी परत अशाप्रकारची घटना घडू नये. एखादे रिझर्व्हेशन ताब्यात मिळाले नाही म्हणून आकसापोटी कार्यवाही करतो. बंद जलवाहिनीचा प्रकार असाच झालेला आहे. लॅण्ड ॲक्वीझीशन करुन हे करायला पाहिजे होते. बंद पाईपलाईनच्या निवीदेचा ज्यावेळेला विषय आला त्यावेळेला वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. या शहरातील करदात्या नागरीकांना न्याय देण्यासाठी ही लोकल बॉडी आहे परंतु कोणालातरी रस्त्यावर आणण्याचे काम होते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळे या शहराची प्रतिमा मलीन होते. नागरीकांमध्ये वेगळा मेसेज जातो. गरीब नागरीकांना घर, जागा घेणे शक्य नाही त्यांना बेघर करण्याचे काम आपण करु नये. हे पाप आपण करु नये.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आजचा सकाळ पेपर वाचला असेल त्यामध्ये आलेले आहे की "आय टू आर" चा गोलमाल व्यवहार. आता पेड न्युज राहिलेली नाही. ही बातमी सकाळ सारखा पेपर देतो आहे. या विषयाबद्यल खुलासा करावा.

मा.महापौर :- आपण विषय आल्यानंतर बोलावे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी लक्षवेधी मांडतो.

मा.महापौर :- लक्षवेधीची तरतूद नाही.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सकाळ पेपरमध्ये " आय टू आर " चा गोलमाल व्यवहार असा शब्द आलेला आहे त्याचा खुलासा पाहिजे. प्लॅन पास करण्याच्या अगोदर १० टक्के जागा महापालिकेला द्यायला पाहिजे परंतु आपण अगोदर प्लॅन पास करतो. किती बिल्डर्सनी १० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात दिलेली नाही. १० टक्के जागा ताब्यात दिल्याशिवाय प्लॅन पास कसा काय करतो. ज्यांनी असे प्लॅन पास केलेले आहेत त्यांच्यावर कारवाई करायला पाहिजे. प्लॅन पास करण्याच्या अगोदर १० टक्के जागा महापालिकेला दिलेली नाही तरी प्लॅन पास केलेले आहेत हे ज्या ज्या सिटि इंजिनिअरच्या काळात झालेले आहे त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. कोणकोणत्या बिल्डर्सनी या जागा ताब्यात दिलेल्या नाहीत व का दिलेल्या नाहीत आणि अधिका-यांनी या जागा ताब्यात न घेता प्लॅन का पास केलेले आहेत हे सांगावे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, खुलासा व्हावा.

मा.महापौर :- विषय येईल त्यावेळेला खुलासा मिळेल.

मा.माया बारणे :- मा.महापौर साहेब, आता आप्पांनी अनाधिकृत बांधकामाचा विषय मांडलेला आहे. गुंठेवारी केलेल्या लोकांच्या बांधकामावर अजूनही कार्यवाही होते आहे. यासाठी उच्च न्यायालयाचे आदेश आहेत का. सत्तारुढ पक्षाचे नाव पुढे करुन हे चालले आहे. प्रत्येक प्रभागामध्ये अनाधिकृत बांधकामाचा अनुभव लोकांना आलेला आहे, याच्याशी संबंधीत जे अधिकारी आहेत त्यांनी खुलासा करावा. आतापर्यंत याचे आऊटपूट काय निघाले हे सांगावे.

मा.निता पाडाळे :- मा.महापौर साहेब, अनाधिकृत बांधकामाना नोटिसा आलेल्या आहेत. बिल्डर्स लोकांचे बांधकाम अगोदर थांबवावे. नागरीकांच्या बांधकामाची गुंठेवारीमध्ये नोंद झालेली आहे त्याचे काय याचा खुलासा द्यावा.

मा.झामाबाई बारणे :- मा.महापौर साहेब, अनाधिकृत बांधकामाबद्यल विषय चाललेला आहे. हा सर्वसामान्य लोकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. बाहेरुन आलेले लोक कामाच्या निमित्ताने येथे आलेले आहेत व त्यांनी एक दिड गुंठा जागा घेवून घर बांधलेले आहे. त्याठिकाणी अगोदर प्राधिकरण होते आता पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे लोकांना असा प्रश्न पडलेला आहे की हे पिंपरी चिंचवड महापालिकेत आहे का प्राधिकरणामध्ये आहे. या विषयावर मार्ग काढून लोकांना मार्गदर्शन केलेतर त्यांना दिलासा मिळेल, तशी बातमी पेपरमध्ये द्यावी. सत्तारुढ पक्षाने ही कारवाई सुरु केलेली असेल अशी बातमी पसरविलेली आहे. हा प्रश्न जिव्हाळयाचा आहे यातून मार्ग निघाला पाहिजे. सर्वसामान्य लोकांना वाटते की आम्ही रस्त्यावर येणार का. याच्यामध्ये लोकांच्या भावना वेगळया झालेल्या आहेत. महापालिकेच्या अधिका-यांनी किंवा आपण याचा खुलासा दिलातर बरे होईल कारण पक्षाची, पदाधिका-यांची, आमदारांची बदनामी व्हायला लागलेली आहे. सर्वसामान्य लोकांनी रस्त्यावर येण्याची भूमिका महापालिकेनी घेतलेली असेलतर ते योग्य नाही, यातून मार्ग काढावा व लोकांमध्ये चांगली बातमी जाईल असे करावे.

अ) मा.महापालिका सभा क्र. ६७ दि.२०/१/२०१२, १८/२/२०१२, ६/३/२०१२ व २०/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्र. ६८ दि.१८/२/२०१२, व २०/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका पहिली सभा (विशेष बैठक) क्र. १ दि.१३/३/२०१२, व २७/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्र. २ दि.२०/३/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.एकनाथ थोरात,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...
२) मा. स्थायी समितीकडील ठ.क्र.१६२४४ दि.९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ४ दि.२०/०३/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर दूरध्वनी पर्यवेक्षक अभिनामाचे एकच पद र.रु.९३००-३४५०० ग्रेड पे र.रु.४३०० या वेतनश्रेणीत मंजूर आहे.

मनपाचे मुख्य कार्यालय व यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील कामाचा व्याप विचारात घेता सदर रुग्णालयासाठी “दूरध्वनी पर्यवेक्षक” अभिनामाचे स्वतंत्र पद निर्माण करणे आवश्यक आहे. जेणेकरुन मनपा मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारतीतील दूरध्वनी नियंत्रणासाठी एक व वायसीएमसाठी एक अशी दोन स्वतंत्र पदे कार्यरत राहतील. तरी वायसीएम रुग्णालयासाठी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे र.रु.४३०० या वेतनश्रेणीत “दूरध्वनी पर्यवेक्षक” अभिनामाचे स्वतंत्र पद निर्माण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.झामाबाई बारणे :- मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, वायसीएममध्ये पदनिर्मितीचा हा विषय आहे, या विषयाला विरोध करण्याचे कारण नाही कारण सदस्यानी हा विषय आणलेला आहे. त्यामुळे पास करायचा का परत पाठवायचा हे आपण ठरवायचे आहे. आताच वैद्यकीय विभागामध्ये वैद्यकीय अधिका-यांची नोकरभरती झालेली आहे त्याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. बीएएमएससाठी भरती प्रक्रिया राबविली गेली ती राबविते वेळी २००९ ला ज्या अटि व शर्ती दिलेल्या होत्या त्या २०११ ला कमी केलेल्या आहेत. २००९ ला बीएएमएस वैद्यकीय अधिका-यासाठी सहा अटि ठेवलेल्या होत्या त्यापैकी २०११ ला १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची बीएएमएस पदवी उत्तीर्ण व २) इंटर्नशिप पूर्ण व राज्य मेडीकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक. या दोनच अटि व शर्ती ठेवून नोकरभरती केलेली आहे. ही नोकरभरती २०११ ला नवव्या महिन्यात काढलेली होती त्यावेळेला नगरसेवक आपआपल्या वॉर्डामध्ये गुंग होते. याठिकाणी उमेदवार डोळयासमोर ठेवून अटि व शर्ती कमी केलेल्या आहेत व दोनच अटि व शर्ती ठेवलेल्या आहेत.  आपण याठिकाणी वैद्यकीय अधिक्षक डॉ. जगदाळे यांच्या सुनेला स्नेहा पावसे यांना डोळया समोर ठेवून ही भरती राबविलेली आहे. २००९ च्या अटि का बदलल्या आहेत. त्याठिकाणी प्रशासन विभागाच्या कर्मचा-यांनी अतीशय इमानदारीने काम केलेले आहे त्यांनी हा अर्ज अपाञ ठरविलेला आहे. दि.२०/१२/२०११ च्या मा.आयुक्त यांच्या मान्य प्रस्तावानुसार अर्ज पाञ ठरविण्यात येत आहे असे केले आहे, हा काय प्रकार आहे. एखादया अधिका-याच्या सुनेसाठी असे प्रकार होणार असतीलतर महापालिकेत जे प्रामाणिकपणे काम करतात त्यांना प्रमोशन येथे मिळणार आहे का. त्याठिकाणचे डॉक्टर्स परिक्षेला बसलेले होते त्यांना वेटिंगलिस्टला ठेवलेले आहे. निवड समितीमध्ये असलेल्या एखादया सदस्याचा विषय असेलतर तो सदस्य बाहेर गेला पाहिजे.  त्याठिकाणी डॉ. जगदाळे साहेब यांच्या सुनेचा विषय असताना ते तेथे कसे काय बसले. तसेच त्यांच्या सुनेचे कागदपञ त्यांच्याच सहीने ॲटेस्टेड केलेले आहेत. आम्ही राजकारणी आहोत असे म्हणले जाते, आम्ही मुलाला, पुतण्याला राजकारणामध्ये आणलेतर घराणेशाही होते असे म्हणले जाते आणि अधिका-यांनी असे केलेतर काय म्हणायचे. आणखी एका अधिका-याच्या सुनेचा विषय येणार होता परंतु पेपरमध्ये बातमी आली त्यामुळे तो राहिला.  तरी डॉ. जगदाळे यांच्या सुनेचा विषय वगळून सदरची भरती करावी.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, हा सदस्य प्रस्ताव आहे. यापुर्वी सुध्दा या विषयावर अनेकवेळा चर्चा झालेली आहे. एखादया अधिका-या विषयी आमच्यासारख्या नगरसेवकांना व्यक्तिगत हितसंबंध जोपासण्याचे काहीच कारण नाही. अशा विषयामुळे आमच्या आमच्यात विनाकारण गैरसमज निर्माण होतात. हा विषय अत्यावश्यक असेलतर प्रशासनाने सभागृहात ठेवणे महत्वाचे होते. यापुर्वी सुध्दा चर्चा केलेली होती की भविष्यामध्ये अशाप्रकारचे निर्णय घेणे आवश्यक आहे की, अशा प्रकारचे विषय आणायचे का नाही. वायसीएम हॉस्पिटल या शहरातील मानबींदु आहे त्या हॉस्पिटल मध्ये काय चालते, हे पद किती आवश्यक आहे, शासनाप्रमाणे वर्गवारीचे पालन केले जाते का, यावर प्रशासनाने मत देणे आवश्यक आहे. हे पद आवश्यक असेलतर सदस्यांमार्फत हा विषय का करता आहात आम्ही हे करतो ते योग्य आहे का अयोग्य आहे. अशा पध्दतीचे अधिका-यांचे प्रस्ताव आणायचे नाहीत असे मागे सुध्दा ठरलेले होते तरी याचा खुलासा करावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खरेतर हा विषय कोणालातरी डोळया पुढे ठेवून आलेला आहे. प्रशासनाच्या वतीने खुलासा झाला पाहिजे. सदस्यानी प्रस्ताव ठेवला आहे तो आपण का ठेवलेला नाही. हे पद आवश्यक आहे का यासंदर्भात सांगावे.

मा.सावंत (सह.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, वस्तुस्थिती अशी आहे की हा सन्मा.सदस्यां मार्फत आलेला प्रस्ताव आहे. दुरध्वनीचालकाची ११ पदे आपल्याकडे आहेत त्यासाठी एक पर्यवेक्षकाचे पद भरलेले आहे. प्रशासनाचे असे मत आहे की दुरध्वनीचालकांची ११ पदे लक्षात घेता त्यासाठी २ पर्यवेक्षकाची गरज नाही. प्रशासनाने हा विषय ठेवलेला नाही व या पदाची आवश्यकता नाही.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, प्रशासनाच्या अधिका-यांनी खुलासा केलेला आहे की या पदाची आवश्यकता नाही. महापालिकेचा आस्थापनाखर्च ५० टक्केच्यावर गेलेला असावा असे मला वाटते. कोणालातरी डोळयापुढे ठेवून करत असालतर यास माझा विरोध आहे. आताच खुलासा केलेला आहे की या पदाची आवश्यकता नाही, तरी हा विषय फेटाळावा.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, विषय स्थायी समितीमधुन आलेला आहे. कोणालातरी डोळया समोर ठेवून विषय आलेला नाही. वायसीएम मध्ये ऑपरेटर्स असतील विषयाच्या माध्यमातून आपल्या स्थायी समिती नगरसेवकांना कोणी ना कोणी सांगत असते व त्या प्रमाणे विषय दिला जातो. सावंत साहेबांनी खुलासा केलेला आहे. आस्थापनेवर जास्त भार पडणार असेलतर हा विषय फेटाळावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.मंगलाताई कदम :-  मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक  :- २९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.एकनाथ थोरात,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...
२) मा. स्थायी समितीकडील ठ.क्र.१६२४४ दि.९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ४ दि.२०/०३/२०१२ अन्वये.

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४ दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२० दि.२०/०३/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै (४६५ पै) मधील भागशः मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी

महापालिकेच्या ताब्यात असलेल्या उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्लूएस प्रोजेक्टसाठी प्रयोजन करणेस व कुठल्याही परिस्थिती मध्ये म्हाडा पुणे यांस न देणेस व जोपर्यंत या विषयावर निर्णय मा.सभेमध्ये होत नाही तोपर्यंत कुठलीही कार्यवाही ठ.क्र.१२४६ दि.१४/१२/२०११ प्रमाणे न करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.संदीप चिंचवडे :- मा.महापौर साहेब ठरावास मी अनुमोदन देतो.

मा.गौतम चाबुकस्वार :- मा.महापौर साहेब, या विषयाचा खुलासा करावा.

मा.माछरे (विशेष अधिकारी) :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेतील मौजे च-होली येथील स.नं.४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ पै (४६५ पै) मधील भागशः मंजूर विकास योजनेतील आ.क्र.२/८३ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी योजना या आरक्षणाखालील महापालिकेच्या ताब्यात आलेले क्षेत्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविण्याकामी र.रु.३,२००/- प्रती चौ.मी. दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी असा प्रस्ताव आहे मनपाने म्हाडाला १९ मार्च रोजी पैसे भरण्यासाठी पञ दिलेले आहे. म्हाडाने ५ कोटी ८५ लाख ८८ हजार महापालिकेकडे जमा केलेले आहेत.

मा.गौतम चाबुकस्वार :- मा.महापौर साहेब, दि. १४/१२/११ रोजी ठराव क्रमांक १२४६ काय झालेला आहे हे सांगावे.

मा.माछरे (विशेष अधिकारी) :- मा.महापौर साहेब, दि.१४/१२/११ रोजी ठ.क्र.१२४६ हा पिंपरी वाघेरे येथील ठराव होता त्या ठरावास उपसूचना दिलेली होती. (ठ.क्र.१२४६ दि. १४/१२/११ वाचन केले)

मा.गौतम चाबुकस्वार :- मा.महापौर साहेब, हा विषय भूमि आणि जिंदगी विभागाचा आहे का नगररचना विभागाचा आहे हे सांगावे. तूमच्याकडे डिस्पोजलकरता आहे का. नगररचना विभागाकडून याची माहिती पाहिजे. हा ठराव नगररचना विभागाचा आहे त्यानी या विषयी सांगावे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, म्हाडाचे रिझर्व्हेशन डीपी मध्ये आहे. ३२००/- प्रती चौ.मी. ने ही जागा देतो आहोत. महापालिकेनी ही जागा ताब्यात घेण्यासाठी शेतक-यांना किती मोबदला दिलेला आहे याची माहिती द्यावी. टिडीआर देवून जागा ताब्यात घेतली आहे का लॅण्ड ॲक्वीझेशन करुन ताब्यात घेतली आहे याचा खुलासा करावा. महापालिका एकिकडे ईडब्ल्यूएस अंतर्गत घराचा प्रकल्प राबविते आहे व कमी किमंती मध्ये आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांना घर देण्याचे काम करते आहे आणि दुसरीकडे म्हाडाला खुप कमी किमंतीमध्ये ही जागा देते आहे. हे करताना या शहरातील नागरीकांना हे घर मिळेल असे नाही.

याची पुर्णपणे माहिती नगररचना विभागाकडून दिली पाहिजे. ही जागा कधी ताब्यात आलेली आहे आणि जागा ताब्यात घेण्याच्या संदर्भात कार्यवाही कशी केली आहे. १३ हजार लोकांना घरे देतो आहोत त्यासाठी महापालिकेची जागा शिल्लक आहे का याची सुध्दा माहिती द्यावी.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, साडेतेरा हजार नागरीकांना आपण घर देणार असे सांगीतलेले आहे. मग च-होलीची जागा म्हाडाला कशाला द्यायची. ३२०/- रु.स्क्वे.फुटाने कुठेतरी जागा आहे का. आपण ईडब्ल्यूएस स्किमसाठी ही जागा का वापरली नाही. आपण फक्त ६५०० लोकांसाठी घरे बांधलेली आहेत व बाकी लोकांसाठी याठिकाणी घरे बांधायची आहेत ही कोणाची बुध्दी आहे. चुकिचे काम चालले आहे. हा ठराव जसा आलेला आहे तसाच पास करावा.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, सभागृहात निम्म्याच्यावर नगरसेवक हे बिल्डर्स आहेत त्यांना जागेचा भाव माहिती आहे. असे असताना उपसूचनेद्वारे ठराव कधी बदलला हे समजलेले नाही. आताच सांगीतले ५ कोटी ८५ लाख रक्कम भरलेली आहे. ही उपसूचना कोणी दिली आहे, हे ज्यांनी कोणी केलेले आहे ते झ ारीतील शुक्राचार्य कोण आहेत त्यांची नावे सुध्दा कळू दिलेली नाहीत. हा १४/१२/२०११ ला उपसूचनेद्वारे ठराव झालेला आहे व आयुक्त साहेबांचा प्रस्ताव १९/११/२०११ चा आहे. हे सर्व करुन ५ कोटी घेवून बसलेलो आहोत. हा विषय मंजूर केला नाहीतर ही रक्कम परत पाठविणार आहात का. “ आंधळं दळतंय आणि कुत्र पिठ खातय ” अस म्हणून म्हणून तसच झालेले आहे. हे सभागृह या पापात सहभागी नाही परंतु ते सुध्दा आहे असे झालेले आहे. आयुक्तांनी केलेले खरे आहे का सभागृहाने केलेले खरे आहे. हा विषय निश्चितपणे असेल तसा मंजूर झाला पाहिजे आणि म्हाडाकडून जी रक्कम घेतली आहे ती त्यांना परत दिली पाहिजे. महापालिकेच्या माध्यमातून ईडब्ल्यूएस ची घरे बांधलेली आहेत, लोकांकडून फॅार्म भरुन घेतले आहेत. सत्तारुढ पक्षावर हा ब्लेम येतो असे आताच झामाबाई बारणे यांनी सांगीतलेले आहे. अजीत पवार यांनी सांगीतले आहे की उपसूचना घेवू नका, तुम्ही त्यांचे ऐकायचे नाही असे ठरविलेले आहे का. याठिकाणी उपसूचना दिलेली आहे त्यांचे नाव जाहिर करावे. हा विषय कसा बदलला आणि किती तारखेला म्हाडाने पैसे भरलेले आहेत याचा सुध्दा खुलासा करावा.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, हा जो विषय आहे तो प्रशासनाकडून सभागृहा समोर ठेवलेला आहे. सुलभाताईनी मुद्या मांडला परंतु प्रशासनाची भूमिका अशी असलीतरी प्रशासनाने यापध्दतीने विषय मांडलेला आहे. या विषयाला सर्वांचाच विरोध आहे. ईडब्ल्यूएससाठी शहरातील नागरीकांसाठी योजना राबवितो आहोत त्यासाठी ही जागा आवश्यक आहे. त्याकरिता शहर सुधारणा समितीने विषय मंजूर केल्याप्रमाणे विषय मंजुर करावा व म्हाडाकडून जी रक्कम या

जागेसाठी महापालिकेला दिली आहे ती रक्कम त्यांना परत करणेत यावी अशी उपसूचना मांडतो.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, या विषयाला जीबीने मान्यता दिलेली आहे. आयुक्तांनी डॉकेट ठेवलेले आहे. उपसूचनेद्वारे हा विषय आलेला नाही. कोणी आंधळ दळत नव्हत आणि कुत्र पिठ खात नव्हत. अशाप्रकारचे आरक्षण पडल्यानंतर त्या जागेचा जमिनमालक कोण आहे याचा विचार केलेला आहे का. ही योजना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट आहे. हा केंद्रशासनाचा विषय आहे त्याला मान्यता दिलेली आहे. या सभागृहामध्ये अनेकवेळा सर्वानी आवाज उठविलेला आहे की, वाढीव टेंडर केले, रेट वाढले. एकेकाळी आपल्या महापालिकेचा फायनानशिअल ग्राफ चांगल्या स्थितीमध्ये होता. त्यानंतर आपली तिजोरी रिकामी झाली. असे असताना केंद्रशासन हा प्रोजेक्ट करते आहे. मनपा प्रोजेक्टमधे ५० टक्के केंद्रशासन ३० टक्के राज्यशासन आणि २० टक्के महापालिका रक्कम टाकत असताना वाढीव टेंडर काढले असा आवाज उठविला गेला आहे. अशा परिस्थितीमध्ये राजीव आवास योजना आहे, म्हाडाची योजना आहे. आपल्या येथील लोकांना हे घर मिळणार असेलतर, जीबीने मान्यता दिलेली आहे, त्यांचे पैसे आलेले आहेत अशा परिस्थितीमध्ये त्यांचे पैसे परत करायचे का. पुन्हा रेट वाढणार परत म्हणणार याठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे. तरी हे त्यांना द्यायला हरकत काय आहे. याला ऑलरेडी मंजूरी दिलेली आहे, त्यांचे पैसे ऑलरेडी आलेले आहेत म्हाडा खर्च करणार असेलतर काय हरकत आहे. हा विषय पुन्हा आपल्याकडे येणार आहे, पायलट प्रोजेक्ट म्हणून आपण मंजूरी दिलेली आहे. भविष्यामध्ये आपण अशा पध्दतीने करावे का नाही म्हणून याला पायलट प्रोजेक्ट म्हणलेले आहे. हा प्रोजेक्ट महापालिकेनी राबवायचा का म्हाडाने राबवायचा एवढाच प्रश्न आहे. दुर्बल घटकासाठी हे म्हाडाने बांधायचे आहे यामध्ये महापालिकेचा सहभाग नसणार आहे. असे असताना दुर्बल घटकांसाठी घरे मिळणार असतीलतर काय फरक पडतो. पुर्वी जीबीने या विषयाला मान्यता दिलेली आहे. हे करत असताना म्हाडा कितीमध्ये घर देते आणि आपण कितीमध्ये घर देतो, त्यांचे रेट आणि आपले रेट, त्यांची क्वॉलीटी आणि आपली क्वॉलीटी हे सुध्दा समजेल असे माझे व्यक्तिगत मत आहे.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, आरक्षण क्र.२/८३ ईडब्ल्यूएससाठी भूसंपादन प्रस्ताव दि.२९/४/२००८ रोजी मनपाने पाठविला. भूसंपादनाची प्रक्रिया चालू असताना टिडीआर घेण्यासाठी मालक आलेतर तो देतो. डिस्पोजलसाठी भूमि आणि जिंदगी विभागाला पाठवितो. जागेचे २०११ साली डिस्पोजल करायचे असेलतर रेडिरेकनरचा जो रेट आहे तो विचारात घेवून त्या जमिनीचे मुल्यांकन करुन दिलेले आहे. ३० टक्के ॲडीशनल कॉम्पोनन्ट द्यायला लागतो. लॅण्डचा रेट अधिक ३० टक्के कॉम्पोनन्ट आहे. २६०० रु. प्र.चौ.मी.

रेडीरेकनरचा रेट होता. स्लॅब लावून रेट काढलेला आहे. टीडीआर ला रेटचा प्रश्न येत नाही. ३२०० रु.प्र.चौ.मी. रेट आहे भुमि आणि जिंदगीला रेट दिलेला आहे त्यांनी पुढील कार्यवाही केलेली आहे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आपण व्यवस्थित खुलासा केलेला आहे. उपसूचना देवून त्यात कंडीशन टाकता येतील म्हाडा जी घरे बांधणार आहे ती घरे पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांनाच द्यावीत अशी त्यात कंडीशन टाकावी आपल्या शहरातील नागरीकांच ही घर द्यावीत त्याकरिता मी उपसूचना मांडतो की- " मौजे च-होली येथील स.नं. ४०८ (जुना ४६४ पै) व ४०९ (जुना ४६५ पै) असणा-या मनपाच्या जागेवर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ पुणे यांचेकडे राजीव आवास योजनेचा पायलट प्रोजेक्ट राबविणे कामी व उपरोक्त क्षेत्राचे मनपाचे इडब्ल्यूएस प्रोजेक्ट करीता राबवित असताना म्हाडासोबत करारनामा करीत असताना सदर प्रोजेक्टमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणा-या घटकांनाच या प्रोजेक्टमधे पात्र करुन घेणेच्या अटीवर व त्यांनाच सदर प्रोजेक्टमध्ये विकसीत केली जाणारी घरे देण्याच्या अटीवर सदर जागा म्हाडा या संस्थेस मान्यता देणेत यावी".

मा.शत्रुघ्न काटे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, बहल यांनी हा विषय त्यांच्या शैलीमध्ये सगळयांना पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शहरातील नागरीकांसाठी हे आहे असे त्यांनी सांगीतलेले आहे. यामध्ये टिडीआर शेतक-यांना मिळाला पाहिजे, त्यांच्यावर अन्याय होतो. जागेचे मुळ मालक कोण आहेत त्यांचे नाव समजलेतर बरे होईल. आर्थिक दृष्टया दुर्बल आणि पिंपरी चिंचवडमधील नागरीक असे म्हणलेले आहे. म्हाडाकडे स्वतःची जागा आहे त्यांना पायलट प्रोजेक्ट राबवायचा असेलतर त्यांच्या जागेमध्ये ते का राबवित नाहीत. ईडब्ल्यूएस मधील राहिलेल्या लाभार्थ्यांना त्यातील घरे देण्यात यावीत. ज्या लाभार्थ्यांची स्क्रूटीनी झालेली आहे त्याच लाभार्थ्यांना ही घरे देण्यात यावीत ही सूचना मान्य असेलतर हा विषय मंजूर करावा. मी उपसुचना मांडते की- संबंधित जागेवर यापुर्वी पिं.चिं.महानगरपालिकेने आर्थिकदृष्टया दुर्बलघटकांसाठी देऊ केलेल्या उर्वरित लाभार्थीना याठिकाणी घरे देण्यात यावीत.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आता योगेश बहल यांनी अभ्यासपुर्वक या विषयाबद्यल समजून सांगीतलेले आहे. म्हाडा या जागेत फ्लॅट बांधणार आहे त्याठिकाणी आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील लोकांना ते द्यावेत अशाप्रकारची सूचना आमच्या सर्वांची आहे. यामध्ये आपला खुलासा पाहिजे की, म्हाडा जो प्रोजेक्ट करणार आहे त्याच्यामध्ये कुठल्या अटि व शर्ती राहणार आहेत आणि

नेमके कोणाला घरे देणार आहेत काय रेटने ही घरे दिली जाणार आहेत व किती दिवसामध्ये हे बांधणार आहेत तसेच म्हाडाने अशाप्रकारची मागणी केली होती का व ती कधी केलेली आहे याचा खुलासा पाहिजे पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांसाठी हा प्रोजेक्ट होणार असेलतरच या विषयाला मंजूरी द्यावी.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, चार वर्षे अगोदर लोकांना सांगीतले होते दिड लाखात घर देणार. साडेतेरा हजार लोकांना घर देणार. त्यातील साडेसहा हजार लोकांच्या अर्जाचे सॉर्टिंग केले आहे उर्वरीत सात हजार लोकांसाठी आपण शब्द दिलेला आहे. उर्वरीत लोकांना हे घर देण्याचे आपण दाखविलेले स्वप्न पुर्ण करायचे आहे का नाही. गेली दोन वर्षे प्रशासन सांगते की आमच्याकडे प्लॉट उपलब्ध नाही मग हा प्लॉट कुठून आला. हा प्लॉट फक्त ईडब्ल्यूएसच्या लोकांसाठीच वापरला पाहिजे. कशाला म्हाडाला द्यायचा. ते येथील नागरीकांनाच देणार याची गॅरंटी नाही. आपल्या वत्कृत्वावर  विषयाला कशी कलाटणी द्यायची याची योगेश बहल यांना माहिती आहे. माझी विनंती आहे की उर्वरीत सात हजार ईडब्ल्यूएस लोकांना घर देण्यासाठी ही जागा वापरण्यात यावी. असे नाही केलेतर लोक आपल्याला माफ करणार नाहीत.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आपण म्हाडाला जागा देतो आहोत. त्यांच्या ताब्यात काही जागा आहे मग ते का मागतात.  म्हाडासाठी असलेल्या जागेचे डीपीतील रिझर्व्हेशन सांगावे.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब,  म्हाडा ही स्वायत्त संस्था असलीतरी शासनाशी संबंधीत संस्था आहे.  एका बाजूला शहरात अनाधिकृत बांधकाम पाडले जाते त्यामुळे काही लोक बेघर झालेले आहेत आणि दुसरीकडे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरकूल योजना राबविते आहे. त्यातील काही लोकांना आणखीन घर दिलेले नाही.  म्हाडाचा उद्देश सर्वसामान्य नागरीकांना घर देण्याचा आहे ही शासनाशी संबंधीत संस्था आहे त्याठिकाणी गोरगरीबांना घर मिळणार आहे. महापालिका आता लोकांना घर उपलब्ध करुन देत नाही. संबंधीत संस्थेचा आपण ॲडव्हान्स घेतलेला आहे. त्यांच्याकडून आपल्याला काहीतरी नियम, अटि उपलब्ध झाल्या असतील ते घर देत असताना कशा पध्दतीने देणार आहेत. सर्वसामान्य लोकांना घर देणार असतीलतर ही संस्था शासनाशी संबंधीत आहे. ही महापालिका शासनाशी संबंधीत आहे. अनाधिकृत बांधकामामुळे गरीब लोक बेघर झालेले आहेत. तरी यातील नियम अटि काय आहेत हे पाहून त्याचा अभ्यास करुन गोरगरीबांना घर मिळत असेलतर यामध्ये काहीच वावगे नाही असे वाटते.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, राजीव आवास योजनेचा विषय आलेला आहे. ही आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरांची योजना आहे. या योजना नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम केंद्रशासना मार्फत केले जाते. ही नव्याने

आलेली योजना आपल्याकडे आहे. पायलट प्रोजेक्ट आपल्या शहरात यावा असे निर्देश आलेले आहेत म्हणून हा ठराव आलेला आहे. जागा काय किमंतीने घेतली आहे याचा लाभ नेमका कोणाला होणार आहे. खरेतर हा ठराव ठेवत असताना त्याची संपुर्ण माहिती द्यायला पाहिजे होती ती देत नाहीत त्यामुळे अशा योजनेची अंमलबजावणी होण्याच्या ऐवजी त्याचा गैरसमज मोठयाप्रमाणात होत असतो. योगेश बहल यांनी सांगीतल्याप्रमाणे राजीव आवास योजना आज जरी राबविली नाही तरी कालांतराने राबवावी लागेल.घरकूल योजना ही पिंपरी चिंचवड शहरासाठी जाहीर केलेली योजना होती.घरकूल योजना केंद्रशासनाकडून आलेली नव्हती. केंद्रशासन जेव्हा जेव्हा योजना राबविते त्यावेळेला कम्प्लशन असते की या योजना राबविल्या पाहिजेत. त्याअंतर्गत असलेले नियम, अटि व कोणाला देणार याची माहिती घेवून हा विषय मंजूर करावा. आपण या योजनेची संपुर्ण माहिती सभागृहाला द्यावी. ही योजना पुण्यासारख्या शहरात होती आपल्याकडे होणार नसेलतर त्याला अर्थ राहणार नाही. घरकुल योजना राबविली पाहिजे त्याचा फायदा वेगवेगळया निवडणूकीमध्ये संबंधीतानी घेतलेला आहे.
मा.प्रमोद ताम्हणकर :- मा.महापौर साहेब, सदरची जागा आपल्या ताब्यात आलेली नाही. त्यातील काही जागा शेतक-यांनी ताब्यात दिलेली नाही. पुर्ण माहिती द्यावी हा विषय तहकूब करावा.

मा.नितीन काळजे :- मा.महापौर साहेब, जून्या लोकांना आपण घर दिलेले नाही. त्या लोकांना घर कधी देणार. बीआरटीएस मध्ये बाधीत लोकांना व उर्वरीत लोकांना घरे कधी देणार आहेत. पहिला जुना विषय क्लिअर झालेला नाही, नवीन विषय कशासाठी घेता.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, विषय तहकूब करणेत यावा.

मा.महापौर :- उपसूचना मागे घ्याव्या लागतील.
(उपसुचना मागे घेण्यास सभेने परवानगी दिल्याने उपसुचना मागे घेणेत आल्याने तसे मा.महापौर यांनी प्रकट केले.)

मा.नितीन काळजे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३०  विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०.४.२०१२  विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.
भूजी/सर्व्हे२/कावि/७५६/११, दि.१९/११/११
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.२४
दि.२९/१२/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२० दि.२०/०३/२०१२ अन्वये.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.अनुराधा गोफणे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.प्रेमकुमार नायर,मा.रामआधार धारिया यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१०दि.२४/१०/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २५ दि.२०/०३/२०१२ अन्वये.

सध्या औदयोगिक भूखंडाचे (Industrial Plot Excluding MIDC Area) निवासी भूखंडामध्ये रुपांतर करुन त्याचा वापर निवासी/बिगर निवासी भूखंडामध्ये करणेत येत आहे. त्यासाठी मा.आयुक्त यांनी ठरविले प्रमाणे प्रिमियम (Premium) आणि १०% भूखंड मनपास सार्वजनिक सुविधेसाठी हस्तांतरण करणे बंधनकारक आहे. यामूळे शहराचे औदयोगिकीकरण कमी होऊन जकातीवर परिणाम होतोय, तसेच येथील नागरीकांना रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत त्यामुळे औदयोगिक भूखंडाचे हस्तांतरण निवासी /बिगर निवासी भूखंडामध्ये यापुढे करु नये (यापुढे दि.१४/०९/२०११ पासून जोपर्यत या विषयावर निर्णय होत नाही तोपर्यत कुठलेही औदयोगिक भूखंडाचे निवासी/व्यापारी भूखंडामध्ये हस्तांतरण करु नये.) यास मान्यता देणेत येत आहे.

मा.सिमा फुगे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आजच्या सकाळ पेपरमध्ये आयटूआर चा गोलमाल व्यवहार अशी बातमी आलेली आहे. त्याचा खुलासा करावा. आपण प्लॅन पास केले आहेत परंतु १० टक्के जागा ताब्यात घेतलेली नाही. प्लॅन पास केल्यानंतर नगररचना विभागाला पत्र पाठवितो, १० टक्के जागा ताब्यात घ्या म्हणून. आतापर्यंत किती बिल्डर्सनी जागा ताब्यात दिलेली आहे. १० हजार स्क्वे.मी. जागा आपल्या ताब्यात आलेली नाही. ज्यांनी जागा ताब्यात दिलेली नाही त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात. अधिका-यांनी माहिती द्यायला पाहिजे.

ज्या ज्या बिल्डर्सनी १० टक्के जागा ताब्यात दिलेली नाही त्यांचे नाव सांगायला पाहिजे. आम्ही पब्लिकला काय उत्तर देणार याचा खुलासा द्यावा. सिटी इंजिनिअरनी किंवा आयुक्तांनी उत्तर दिले पाहिजे. १० टक्के जागा ताब्यात आलेली नाही हे खरे आहे का, ताब्यात आलेली नसेलतर अधिका-यांवर काय कारवाई केली.

मा.काची (उपशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, आतापर्यंत आयटूआर च्या २५ कामाना मंजूरी दिलेली आहे. १४ कोटी अधिमुल्य जमा झालेले आहे. महापालिकेने या विषयांतर्गत आतापर्यंत ७४ हजार चौ.मी. जागा ताब्यात घेणे अपेक्षित होते त्यातील ६२ हजार चौ.मी. जागा ताब्यात आली आहे. उर्वरीत जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही नगररचना मार्फत चालू आहे. ज्यांच्या जागा ताब्यात आलेल्या नाहीत अशा विकसकाच्या बांधकाम परवानगी प्रकरणावर कार्यवाही होत नाही. त्यांना दोन वेळा नोटिसा दिलेल्या आहेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, बिल्डींग परमिशन विभागाने १० टक्के जागा ताब्यात घ्यायला पाहिजे असे आहे.

मा.काची (उपशहर अभियंता) :- मा.महापौर साहेब, यामध्ये रमेश ठक्कर यांनी २४९०.२७ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत होते ती येणे बाकी आहे. ती दिलेली नाही त्यांना नोटिस दिलेली आहे त्यांनी काम सुरु केलेले नाही. त्यांनी बांधकाम परवानगी घेतली आहे अजून त्याठिकाणी बांधकाम केले नाही. डाल्को कंपनी यांनी ५१९.४४ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत आहे. जागा ताब्यात दिली परंतु रजिस्ट्रेशन बाकी आहे. आमच्याकडे ताबा पावती आलेली नाही. आकुर्डी येथील सिध्दविनायक ग्रुप यांनी ७५६८.७२ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत आहे. ती येणे बाकी आहे. कोहिनुर ग्रुप यांनी ५२९.४९ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत आहे. ती येणे बाकी आहे. मंजितसिंग कोहली यांनी ८२.४४ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत आहे. ती येणे बाकी आहे. डॉ.आर.पाचपांडे यांनी ६८१ चौ.मी. जागा ताब्यात देणे अपेक्षीत आहे ती येणे बाकी आहे. चोरडीया बिल्डर्स यांनी ४०७.२० चौ.मी. जागा ताब्या देणे अपेक्षीत आहे ती येणे बाकी आहे. २५ पैकी ७ लोकांच्या जागा ताब्यात येणे बाकी आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, याला रिस्पॉन्सीबल आयुक्त आणि सिटी इंजिनिअर आहेत. सिटि इंजिनिअर आणि आयुक्त चुक झालीतर एक्झिक्यूटिव्हवर, डेप्युटीवर ढकलून देतात. गर्व्हमेंटचे गॅझेट असताना १० टक्के जागा अगोदर घ्यायला पाहिजे होती व त्यानंतर बिल्डींग परमिशन द्यायला पाहिजे होती. तसे का केले नाही. २००२ मध्ये बिल्डींग परमिशन दिलेली आहे तरीही अजूनपर्यंत जागा का ताब्यात आलेली नाही. तुम्ही चुक कबुल करत नाहीत. त्यांच्यावर चार्जशीट इश्यु करा कुठल्या सिटि इंजिनिअरच्या काळामध्ये हे झालेले आहे त्यांच्यावर चार्जशीट इश्यु करा. शासनाच्या गॅझेटप्रमाणे केले नाही म्हणून

त्यांच्यावर ॲक्शन व्हायला पाहिजे. १० टक्के जागा ताब्यात घेतली नाही म्हणून क्लास-१ ऑफिसरवर कारवाई व्हायला पाहिजे. शासनास तसे पत्र पाठवावे.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, महापालिकेनी ज्या १० टक्के जागा घेतलेल्या आहेत त्याठिकाणी काय केले आहे. का त्या अद्याप मोकळया आहेत, का बिल्डर त्या जागा पार्किंगसाठी वापरतात.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, हा शहर सुधारणा समिती मधुन आलेला विषय अत्यंत चांगला आहे. याठिकाणी आताच काची यांनी सांगीतले सात लोकांच्या जागा ताब्यात यायच्या आहेत. परंतु ज्या ताब्यात आल्या त्यांचे काय हे सांगीतलेले नाही. ज्या जागा ताब्यात घेतल्या त्याच्यावर काही केलेले नाही. त्याठिकाणी काही राजकीय पुढा-यांची ऑफिसेस झालेली आहेत, काही ठिकाणी पार्किंग होते आहे. शहरामध्ये एमआयडीसी, प्राधिकरण आणि आपण आहोत आपण शहराचे औद्योगिकीकरण कमी करत चाललो आहोत. प्राधिकरणासारख्या संस्था याठिकाणी आहेत. २०० एकर मध्ये इन्टरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर राबवितात, एमआयडीसी प्लॉट पाडून औद्योगिकरणाला वाव देते आणि आपण औद्योगिकरण कमी करत चाललो आहोत. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते ती ओळख पुसट होत चालली आहे. शहरात जागेचे भाव आकाशाला भिडलेले आहेत एकिकडे रोजगार नाही आणि दुसरीकडे राहण्यासाठी घर नाही अशा कात्रीत नागरीक सापडलेला आहे. कामगार सायकलवरुन जायचा हे पुर्वी चालायचे आज बिल्डींगा, मॉल झालेले आहेत परंतु शहरात रोजगार कमी होत चालला आहे. एमआयडीसी, औद्योगिक क्षेत्रामध्ये गुन्हेगारी वाढलेली आहे असे पेपरमध्ये आलेले आहे, लोकांच्या हाताला कामच नाही त्यामुळे गुन्हेगारीकडे तरुण पिढी वळू लागलेली आहे. आपण सामाजीक न्याय द्यायला पाहिजे. आपण औद्योगिकीकरण थांबविलेले आहे. येथून पुढे आयटूआर ला परवानगी देवू नये. आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत, एखादया सदस्यांनी माहिती घेतलीतरच अशा विषयाची माहिती मिळते. आयुक्तांना ब्लॅन्क अधिकार दिलेले आहेत ते कमी करावेत अशा विषयाला परवानगी द्यायची का नाही हे सभागृहाने ठरवावे.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, कुमार यांनी प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर दिलेले नाही. मी आयुक्तांना विनंती करतो की आयटूआर चा अधिनियम दाखववावा. अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे आयटूआरची कार्यवाही केलली असेलतर हरकत नाही, तशी कार्यवाही झालेली नसेलतर महापालिकेच्या ताब्यात जागा येण्याच्या अगोदर प्लॅन पास करुन देणे अशी तरतूद नसेलतर अशा अधिका-यांवर कारवाई व्हायला पाहिजे. आकुर्डी सारख्या भागामध्ये आयटूआर ची योजना उभी

राहिलेली आहे. मागील पाच वर्षाच्या कालावधीत आरक्षीत जागा ताब्यात घेण्यासाठी मी प्रयत्न केलेले आहेत परंतु प्रशासनास आजपर्यंत जाग आलेली नाही. ज्या जागा प्रशासनाच्या ताब्यात येवू शकतात त्या जागा सुध्दा आपण ताब्यात घेतलेल्या नाहीत. आता सांगीतले अपेक्षीत आहे, अपेक्षीत याचा अर्थ काय आहे. तो बिल्डर ती जागा पार्किंगसाठी वापरत असेलतर काय उपयोग आहे. पिंपरी चिंचवडचे नागरीक टॅक्स भरतात त्यांचा त्या जागेवर अधिकार आहे, हक्क आहे. आयटूआर विषयाच्या अधिनियमाची माहिती सर्व सदस्यांना द्यावी. तोपर्यंत हा विषय तहकूब करावा. आम्हांला अधिनियम वाचून दाखवावा, अधिनियम काय आहे हे सांगावे.

मा.संजय काटे :- मा.महापौर साहेब, २००४ च्या गॅझेटप्रमाणे १० टक्के जागा घ्यायच्या राहिल्या असतीलतर त्या घ्यायला पाहिजेत. २००८ साली शासनाचा जीआर आलेला आहे त्यामध्ये १० टक्केचा विषय राहिलेला नाही. त्यामध्ये वेगवेगळे आलेले आहे. ५ टक्के, २० टक्के, २५ टक्के असे आहे. १० टक्के बंद झालेले आहे आता वेगवेगळया पध्दतीने कार्यवाही सुरु आहे. माझ्या सारख्या जमीनमालकाचे भूखंड औद्योगिक म्हणून घोषित झाले त्यावर अद्यापपर्यंत काहीच झाले नाही. त्या भागात औद्योगिक कंपन्या येणारच नसतीलतर व्यावसायीकांनी मॉल का करु नयेत, त्यामुळे रोजगार मिळणार आहे, महापालिकेला उत्पन्न मिळणार आहे. सभागृहाने हा विषय फेटाळावा.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, हा परिसर औद्योगिक म्हणून जाहिर झाला तेव्हापासून जे भूखंड विकसीत झालेले नाहीत असे भूखंड ट्रान्सफर करण्यास हरकत नाही अशा याठिकाणी सभासदांच्या भावना आहेत. ज्याठिकाणी कारखाने चालू आहेत अशा औद्योगिक भूखंडाचे रुपांतर निवासी भूखंडामध्ये करु नये असा विषय आहे. पक्षनेत्यांच्या कार्यालयात ठरल्याप्रमाणे हा विषय फेटाळावा.

मा.अजीत गव्हाणे :- मा. महापौर साहेब, इन्डस्ट्रीयल टू रेसिडेन्शीअल करण्याचा हा प्रस्ताव आहे. शासनाच्या मान्यतेनंतर महापालिकेनी इन्डस्ट्रीअलचे रेसिडेन्शीअल करण्यास परवानगी दिलेली होती. १० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात द्यायला पाहिजे होती त्याची कार्यवाही करणे अपेक्षीत होते. आर.एस.कुमार यांनी शहर सुधारणा मार्फत विषय आणला होता. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. या ठिकाणची कारखानदारी शहराच्या बाहेर जाऊ नये. कारखानदारीच्या निमित्ताने या शहरातील लोकाना रोजगार मिळावा अशी त्यांची भूमिका होती. परंतु हे करत असताना हे शहर ख-या अर्थाने शहर होऊ लागलेले आहे. बदलत्या परिस्थितीनुसार पिंपरी चिंचवड शहरात कारखानदारी चालविणे अवघड होत चालले आहे चाकणमध्ये मोठयाप्रमाणात कारखानदारी उभी राहते आहे त्याठिकाणी शासनाकडून, ग्रामपंचायतीकडून त्यांना सुविधा दिल्या जातात, टॅक्समध्ये सवलत दिली जाते त्यामुळे तेथे कारखानदारी स्थलांतरीत होत आहे. अशा परिस्थितीमध्ये आपल्या येथील काही कारखाने बंद

पडण्याच्या अवस्थेमध्ये आहेत ते बंद पडल्यानंतर याठिकाणी काय बदल केला पाहिजे या अर्थाने हे बदलले आहे आणि त्याची आवश्यकता विचारात घेता हा प्रयत्न केलेला आहे. आपल्याला जकातीचे उत्पन्न चांगले मिळते व आपल्या येथील कारखानदारी बाहेर जाते. आपल्या शहरातील उत्पन्न टिकले पाहिजे जकातीतून जेवढे उत्पन्न मिळते तेवढेच उत्पन्न इतर माध्यमातून मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न केला पाहिजे. भविष्यकाळात अशी कारखानदारी बाहेर जाणार, त्यावेळेला आपल्या शहरातील उत्पन्न कमी होता कामा नये. इतर माध्यमातून महापालिकेला उत्पन्न कसे मिळेल यासाठी काहीतरी भूमिका घेतली पाहिजे. काटे यांनी भूमिका मांडलेली आहे. या शहरात असे अनेक प्लॉट आहेत की ते इन्डस्ट्रीअल प्लॉट म्हणून घोषीत केलेले आहेत परंतु त्याठिकाणी कारखानदारी झालेली नाही अशा जागा मालकांवर अन्याय होतो त्यामुळे त्यांनी अशाप्रकारची मागणी करणे गैर नाही. च-होलीमध्ये अशाप्रकारचा प्रोजेक्ट झालेला आहे. डीपी प्लॅन झालेला आहे त्याठिकाणी इन्डस्ट्रीअल प्लॉट टाकण्यात आलेले आहेत परंतु त्याठिकाणी इन्डस्ट्री होऊ शकत नाहीत. बिल्डींग परमिशन देताना आपल्या अधिका-यांनी कुठल्या नियमांचे उल्लंघन केले का, हे तपासणे आवश्यक आहे. नियमात बसून केलेले असेलतर हरकत नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उत्पन्न कमी होणार नाही याची खबरदारी घ्यावी आणि हा विषय फेटाळून लावावा.

मा.वसंत लोंढे :- मा.महापौर साहेब, खरेतर आपल्या पिंपरी चिंचवड शहरात कै.यशवंतराव चव्हाण यांनी एमआयडीसी आणल्यामुळे हे शहर मोठयाप्रमाणात उद्यास आले, कामगारांना नोक-या मिळाल्या. भोसरी सर्व्हे नं.७, ८, ९, १०, ११, १२, १३ याठिकाणी कारखानदारी आली लोकांना रोजगार मिळाले. शहरात उद्योग वाढावेत म्हणून सुरुवातीला निवासी क्षेत्र औद्योगिक केले होते आणि आता औद्योगिक म्हणून मंजूरी दिलेले क्षेत्र बिगर निवासी, निवासी करु लागलेले आहेत. गुजरात मध्ये इन्डस्ट्रीअलला मोठयाप्रमाणात वाव मिळालेला आहे आणि आपल्याकडे कमी होऊ लागलेला आहे. त्यामुळे औद्योगिक कंपन्या कमी होत आहेत आपण जे करतो आहोत ते चुकिचे करतो आहोत. लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे. १७ लाख लोकसंख्या आहे त्यामुळे मॉल करण्यापेक्षा इन्डस्ट्रीअल करणे आवश्यक आहे. इन्डस्ट्रीअल झोन बदलू नये अशी माझी भूमिका आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सकाळ पेपरमध्ये आयटूआरचा गोलमाल व्यवहार असे आलेले आहे. औद्योगिक भूखंडाचे निवासी जागेत रुपांतर केल्याच्या मोबदल्यात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालकीची सुमारे पावणेतीन एकर जागा तब्बल अकरा वर्षानंतरही ताब्यात घेण्यात आलेली नाही. पुणे मुंबई महामार्गालगत मोक्याच्या ठिकाणी असलेली कोटयावधी रुपये किमंतीची ही जागा पालिकेच्या काही अधिका-यांमुळे काही बिल्डरांच्या घशात गेल्यासारखी आहे वारंवार मागणी होऊनही या जागा ताब्यात घेण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आजही हालचाल करताना दिसत नसल्याने संशय बळावला आहे. असे सकाळ पेपरमध्ये आलेले आहे. येथील कामगाराना नोक-या नाहीत. गरवारे कंपनी बंद झाली त्यावेळेस कोणीतरी इन्ट्रेस्ट

घेतला असतातर ती कंपनी बंद पडली नसती. जकाती एवढा प्रॉपर्टि टॅक्स मिळणार का. या शहरातील कंपन्या कमी झाल्यातर हे शहर डुबणार आहे त्यानंतर येथील नागरीक आपल्याला माफ करणार नाहीत हा ठराव पास करावा.

मा.भाऊसाहेब भोईर **:-** मा.महापौर साहेब, या विषयासंदर्भात चर्चा करणार नव्हतो. विशिष्ट नाव घेतल्यानंतर सर्वांनी माझ्याकडे पाहिले. मते भिन्न असताना कायद्याचा आधार घेऊन कोणत्याही गोष्टीचा उल्लेख येत असतो. सर्व प्रक्रिया विशिष्ट डिग्रीतून जावी लागते. मी बांधकाम व्यावसायिक आहे. २२ वर्षांपासून नगरसेवक आहे. २२ वर्षांत एकाही ठेकेदाराला भेटलेलो नाही की बांधकाम परवानगी विभागात २२ वर्षांत २२ वेळा सुद्धा गेलेलो नाही. आर.एस.कुमार यांचे सुद्धा मनापासून अभिनंदन करतो. मत मांडत असताना वाद निर्मिती होते. अनधिकृत घरांचा सुकाळ असताना त्यासंदर्भात वाटचाल करताना अधिकृत कामाबाबतच्या विषयावर बोलतो. आपण सुद्धा एक शहर म्हणून आत्मचिंतन करण्याची गरज आहे. या शहराची खऱ्या अर्थाने श्रीमंत अशी ओळख होती. ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली तर १९८३ मध्ये पुणे शहराला मेट्रोपॉलिटन सिटीचा दर्जा दिला गेला. मेट्रो पॉलिटन सिटी होत असताना शहराचे औद्योगिकरण आजूबाजूच्या खेडोपाड्यात पसरले जाते. हीच गरज ओळखून कै.आण्णासाहेब मगर यांच्यासारख्या नेत्यांनी पिंपरी चिंचवड शहराला औद्योगिक शहरात विस्तारित करण्याचा निर्णय घेतला. इथे M.I.D.C. आली, प्राधिकरण आले. औद्योगिकरणाचे रेसिडेन्शियल होत नाही, संस्था वेगळी आहे. दोन गोष्टी एकत्रित करुन औद्योगिकरण करुन घेतलेले आहे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला जरी वाटले तरी सिस्टीम वेगळ्या दिशेने जात नाही. आपण औद्योगिकरण हे निर्माण प्रक्रियेतून करत असताना १०% घेतले का नाही हे केले आहे. त्याठिकाणी संबंध नाही हे चित्र कुठेतरी थांबवण्यासाठी जास्त जबाबदारी स्विकारुन समर्थन करणे गरजेचे आहे. काटे स्वतः बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांची भूमिका स्पष्ट केल्यानंतर दुसरी फिगर घेऊन रितसर प्रक्रियेतून पूर्ण केले नाही त्याबद्दल बोलतो. विभागणी करणे गरजेचे आहे. शहराच्या निश्चित मतांच्या जोरावर आपण काम करतो, विशेष दिशेला प्रयत्न करतो ते योग्य आहे. प्रत्येकाच्या मताचा आदर करतो. मला सुद्धा नैतिक अधिकार आहे. बजाज ऑटोचा प्रकल्प प्रचंड वाढ होत असताना औरंगाबाद इथे गेला. प्रत्येक व्यावसायिकाची गरज वेगवेगळी असते. चाकण इथे लॅण्ड ॲक्वेझिशन, जकातीचे उत्पन्न, कामगार पुरवठा इ. साठी फियाट सारख्या कंपन्या गेल्या आहेत त्यांनी प्रकल्प इथे घेतला नाही. टेल्कोची सर्वात जास्त जागा असतानाही टेल्कोने गुजरात सरकारने त्यांना करमाफी दिल्यामुळे त्यांचा प्रकल्प गुजरातला हलवला. व्यावसायिक त्याचा फायदा जिथे जास्त होतो तिथे जातो. स्पर्धेच्या युगात उद्योग गतीने वाढवायचा, कुठला वाढवायचा याचे बंधन नाही. परिसरातील औद्योगिकरण रहायचे असेलतर जकात माफी करा, कशासाठी मागतोय. व्यवसाय कुठेही गेला तरी उन्नती केल्याशिवाय राहत नाही. प्रवर्तन होते आहे. १९७८ सालातील शहर व आत्ताचे शहर असेच वाटते आहे का? ज्या

ठिकाणी नाविन्यातून काही घडले नाही तिथे दिशा दिली गेली नाही हे निश्चित आहे. या मताशी मी सहमत आहे. ज्यांनी फक्त १०% जागा दिल्या त्यांना पाठीशी घालू नका. कामगार नगरी ही या शहराची ओळख कधीच पुसली जाणार नाही. आज टेल्कोचा कामगार या शहरात स्वतःचा फ्लॅट घेऊ शकत नाही. जो पुण्यात घेऊ शकत नाही तो पिंपरी-चिंचवड मध्ये घर घेतो ही प्रगतीची व्याख्या आहे. जाचक नियम करुन प्रगती घडवणे म्हणजे जास्त मोल येणे अपेक्षित नाही का. आपल्याकडे इंडस्ट्रीज नको हे ठरवून टाका. पारंपारिक पद्धतीने चालू ठेवुन उद्योगपती ऐकणार नाही. १०० कामगार जगवण्यासाठी, स्पर्धेत टिकवण्यासाठी उद्योगपती कंपनी देऊन दुसरीकडे जागा शोधतो. नागरिकांना उत्तर देण्यासाठी वस्तुस्थिती व वास्तव नाकारुन चालणार नाही. कामगारांच्या जीवावर निवडून आलो आहोत. आपण त्यांना अडवू शकत नाही. शहरात मॉल नको आहेत का, आयनॉक्स सारखी थिएटर नको आहेत का ? निर्माण घडत असताना संपूर्ण औद्योगिकरणातून उद्योगामुख व्यवसाय करणारा वेगळा विकसक आहे. शहरात काहीतरी वाईट होईल अशी वाढ करु नका.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, औद्योगिक शहराची व्याख्या काय असावी याबद्यल सांगीतलेले आहे. औद्योगिकवाल्यांची मागणी जकात बंद करा म्हणून आहे. गुजरातमध्ये टॅक्स घेत नाहीत, सर्व ठिकाणी अशाप्रकारचे टॅक्सेस बंद आहेत. आर.एस.कुमार यांना माहिती असेल वीस वर्षामध्ये आपल्याकडे एकच जकात नियमावली आहे जकात वाढविली नाही असे असताना सुध्दा बजाज कंपनी औरंगाबादला गेली, महेंद्रा, मर्सिडीस बेन्झ, सेन्च्यूरी एन्का यासारख्या कंपन्या बाहेर गेल्या, टेल्कोला सवलती दिल्यातरी बाहेर गेली. वास्तविक पाहता इन्डस्ट्री वाढलेली आहे. सवलती दिल्यानंतरही चाकण याठिकाणी इन्डस्ट्री गेलेली आहे. आर.एस.कुमार यांनी सांगीतले नियम वाचावे. एमआरटीपी ॲक्टमध्ये कोणतीही जागा विनामोबदला घेण्याची तरतूद आहे का, याचा खुलासा करावा. आपल्याकडे नोटिफिकेशन आलेले आहे. कोणत्याही प्रकारचा प्रिमिअम घ्यायचा नाही त्या बदल्यात टिडीआर अनुज्ञेय केलेला आहे. आमच्या काही मित्रानी जागा दिलेल्या आहेत. विनामोबदला जागा द्यावी लागते म्हणून बिल्डर्स या जागा देत नाहीत.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, ॲक्वीझेशनच्या तरतूदीमध्ये कोणत्याही जागामालकाची जागा विनामोबदला घेता येत नाही. विनामोबदला, फ्रि ऑफ एफएसआय याबद्यल २००४ साली आयटूआर प्रोव्हीजन केली त्यामध्ये १० टक्के जागा घ्यावी अशी तरतूद होती. नंतर २००६ मध्ये शासन स्तरावर याचा विचार झाला आणि एमआरटीपी मध्ये मॉडीफिकेशन मायनर प्रापोज केले त्याच्यावर कार्यवाही होऊन २००८ साली नवीन कायदा आला डीसी रुलमध्ये २ एकरसाठी ५ टक्के, २ ते ५ एकरसाठी २० टक्के ॲमेनिटीस्पेस घ्यावी असे केले. शासनाने विचार करुन हि प्रोव्हीजन पाठविलेली आहे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, २००८साली नवीन नोटिफिकेशन आलेले आहे. चुकिचा अर्थ लावून आरडाओरड करायची असे चालले आहे. १० टक्के जागा विनामोबदला घेत होतो म्हणून ते लोक देत नव्हते. मागच्या वेळेस घाईघाईने दुसरा विषय झालेला आहे ते बीआरटीएसमध्ये अडकलेले आहे तसेच ब्ल्यू लाईन रेड लाईनचे झालेले आहे. विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अजीत गव्हाणे :- सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. प्रेमकुमार नायर , मा.रामआधार धारिया यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.१० दि.२४/१०/२०११
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. २५ दि.२०/०३/२०१२ अन्वये.

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. वृक्ष/३/कावि/१०७/२०१२ दि.१६/३/२०१२

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये महापालिका क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करणे आवश्यक आहे. महापालिकेची सन २०१२ मध्ये सार्वत्रीक निवडणुक झालेली असून नव्याने वृक्षप्राधिकरणाची रचना/स्थापना उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ कलम ३ (१) अन्वये वृक्षप्राधिकरण गठित करणे आवश्यक आहे.

सदर अधिनियमातील प्रकरण २ कलम ३ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात. व त्याच्या सह कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्या मधुन अध्यक्षासह कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सदस्य संख्या असलेली समिती गठीत करावयाची आहे. तरी वृक्षप्राधिकरण सदस्यांची नेमणुक करणेबाबतचा विषय नजिकच्या मा.महापालिका सभेपुढे घेणेत यावा असा मा.आयुक्त यांजकडील प्रस्ताव आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-
मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मा.आयुक्त (अध्यक्ष) यांचेव्यतिरीक्त १)मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे २) मा.उल्हास शेट्टी ३) मा. ननवरे जितेंद्र बाबा ४)मा.सौ.मंगला अशोक कदम ५) मा.सौ.सविता सुरेश साळूंके ६) मा.तानाजी विठ्ठल खाडे ७) मा.सिमा दत्तात्रय फुगे ८) मा.संजय मल्हारराव वाबळे ९) मा.शमीम पठाण १०) मा.संगिता राजेंद्र भोंडवे ११) मा.सदगुरु महादेव कदम १२) मा.अश्विनी अजित मराठे (चिखले) १३) मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे १४) मा.समिर मोरेश्वर मासुळकर या सदस्यांची वृक्षप्राधिकरण सदस्य म्हणून नेमणुक करुन वृक्षप्राधिकरणाची रचना करणेत यावी.

मा.अपर्णा डोके :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
वृक्ष/३/कावि/१०७/२०१२ दि.१६/३/२०१२

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये महापालिका क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करणे आवश्यक आहे. महापालिकेची सन २०१२ मध्ये सार्वत्रीक निवडणुक झालेली असून नव्याने वृक्षप्राधिकरणाची रचना/स्थापना उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ कलम ३ (१) अन्वये वृक्षप्राधिकरण गठित करणे आवश्यक आहे.

सदर अधिनियमातील प्रकरण २ कलम ३ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात. व त्याच्या सह कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त

पंधरा सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्या मधुन अध्यक्षासह कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सदस्य संख्या असलेली समिती गठीत करावयाची आहे. तरी वृक्षप्राधिकरण सदस्यांची नेमणुक करणेबाबतचा विषय नजिकच्या मा.महापालिका सभेपुढे घेणेत यावा असा मा.आयुक्त यांजकडील प्रस्ताव आहे. मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मा.आयुक्त (अध्यक्ष) यांचेव्यतिरीक्त १)मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे २) मा.उल्हास शेट्टी ३) मा. ननवरे जितेंद्र बाबा ४)मा.सौ.मंगला अशोक कदम ५) मा.सौ.सविता सुरेश साळूंके ६) मा.तानाजी विठ्ठल खाडे ७) मा.सिमा दत्तात्रय फुगे ८) मा.संजय मल्हारराव वाबळे ९) मा.शमीम पठाण १०) मा.संगिता राजेंद्र भोंडवे ११) मा.सदगुरु महादेव कदम १२) मा.अश्विनी अजित मराठे (चिखले) १३) मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे १४) मा.समिर मोरेश्वर मासुळकर या सदस्यांची वृक्षप्राधिकरण सदस्य म्हणून नेमणुक करुन वृक्षप्राधिकरणाची रचना करणेत येत आहे.

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ३३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

दि. १६/१२/२०११, २०/१२/२०११ व २३/१२/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.संदीप चिंचवडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ३४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

दि. २८/१२/२०११ व २/१/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.संदीप चिंचवडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ३५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.शहर सुधारणा समिती

अ) दि. १४/९/२०११, २८/९/२०११, २१/१०/२०११ व २४/१०/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि. १२/९/२०११, १६/९/२०११, २३/९/२०११, २८/९/२०११, १२/१०/२०११, २१/१०/२०११, २४/१०/२०११, २/११/२०११, ४/११/२०११, ९/११/२०११,२३/११/२०११, ५/१२/२०११, १४/१२/२०११ व २८/१२/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.२८/१२/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) दि.१४/१२/२०११, २८/१२/२०११ व २९/१२/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.संदीप चिंचवडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ३६ विषय क्रमांक :- ८

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिति

दि.१६/११/२०११ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.संदीप चिंचवडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ९

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ -१) क्र.भूजिं/६/कावि/५०५/२०११, दिनांक ६/९/२०११ रोजीचा मा.आयुक्त साहेब यांचा प्रस्ताव.

२) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.३६ दि. २१/१०/२०११

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पिंपरी वाघेरे यशवंतराव चव्हाण स्टेडियम खालील व्यापारी गाळे २५ वर्षे भाडेपट्टयाने लिजने वितरणासाठी नगररचना विभागाने पत्र क्रमांक नरवि/पिंपरी/४८/२०१०, दिनांक ८/४/२०१० अन्वये रक्कम रुपये २७,५००/- प्रति चौ.मी. इतका लिजदर निश्चित करुन दिलेला आहे त्याप्रमाणे पिंपरी वाघेरे यशवंतराव चव्हाण स्टेडियम खालील व्यापारी गाळे २५ वर्षे दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने लिज वितरीत करणेकामी दै.कातिब, दै.पुणे जिल्हा सांज समाचार,दै.लोकमत,दै.बहुजनरत्न लोकनायक, सा.गगनझेप, सा.पुष्पप्रकाश वृत्तपत्रात निविदा नोटीस क्र.१/२०१०-११ अन्वये प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्याप्रमाणे गाळा क्र. ४व ५ साठी प्रत्येकी एक निविदा अशा एकूण २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. जरी प्रत्येक गाळयास एकच निविदा प्राप्त झालेली असलीतरी प्राप्त सर्वोच्च निविदा दर हा मनपा अपेक्षित लिज रकमेपेक्षा अधिक आहे. सर्वोच्च निविदादरांचा तक्ता प्रपत्र अ मध्ये जोडलेला आहे. सर्वोच्च निविदा दर प्रपत्र अ प्रमाणे २ व्यापारी गाळयासाठी प्राप्त निविदा सर्वोच्च दरा नुसार रक्कम रुपये १०८००००/- मनपा शासन कराव्यतिरिक्त उत्पन्न २५ वर्षे भाडेपट्टयासाठी मिळणार आहे. सदर उत्पन्न २ गाळयाकरीता असणारी मनपा अपेक्षित लिज रक्कम रु. १०,६४,८००/- पेक्षा रक्कम रुपये १५,२००/- ने अधिक आहे त्यामुळे मनपा आर्थिक हित व गाळे विनावापर पडून राहिल्याने होणारी घुसखोरी अतिक्रमण, थकबाकी इत्यादी बाबी विचारात घेता सोबतचे प्रपत्र अ मधील सर्वोच्च दराचे निविदाधारकांना निविदा अटी शर्ती नुसार २५ वर्षे भाडे पट्टयाने करारनामा करुन गाळे वितरीत करणे प्रस्तावित आहे.

सबब प्रस्तावित केलेप्रमाणे सोबतचे प्रपत्र अ मधील २ सर्वोच्च दर निविदाधारकांना वरील ठिकाणचे व्यापारी गाळे सर्वोच्च निविदा दर व अटी शर्ती नुसार २५ वर्षे भाडेपट्टयाने लिजने वितरीत करणेकामी व त्यासंबंधीची करारनामा मान्यतेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ क नुसार मान्यता देणेत येत आहे.

मा.साधना जाधव :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

मा.मंदाकिनी ठाकरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३७ विषय क्रमांक :- ९

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ -१) क्र.भूजिं/६/कावि/५०५/२०११, दिनांक ६/९/२०११ रोजीचा मा.आयुक्त साहेब यांचा प्रस्ताव.

२) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.३६ दि. २१/१०/२०११

विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-९० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १०

दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/ड-१/७०/२०१२ दि.१६/४/२०१२

महानगरपालिका मंजूर सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१८९३/१२७६/सीआर/१७४/९३/युडी-१३ दि. १८ सप्टेंबर १९९५, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि. २८ नोव्हेंबर १९९५ नुसार काही भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका नियोजन नियंत्रण कक्षेत शासन निर्णय क्र. पीएसएन/१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि. १५ नोव्हेंबर १९९७ समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच या समाविष्ट क्षेत्रापैकी विकास योजना मंजूरीचेवेळी वगळलेल्या क्षेत्रासाठी शासन निर्णय क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३ दि. २८ डिसेंबर १९९९ नुसार मान्यता मिळालेली आहे. महापालिका क्षेत्रात वाढीव हद्दीच्या विकास योजनेस टिपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८ ऑगस्ट २००९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवज करण्यात आलेला नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेकडे भोसरी, पिंपरी, पिंपळेगुरव व सांगवी मधील एकूण १४ प्रकरणी जागामालकांनी रस्त्याचे आरक्षणाने बाधित जमीनीचा मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय मिळणेसाठी महानगरपालिकेकडे अर्ज/प्रस्ताव दाखल केले आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.४.३ मधील तरतूद मध्ये (Development rights (DR's) are available only in case where development of a reservation has not been implemented) ज्या ठिकाणी आरक्षण विकसीत झालेले नाही त्या ठिकाणी देय राहिल, यामुळे मोबदला स्वरुपात टीडीआर/एफएसआय अदा केलेला नाही. वरील प्रमाणे महानगरपालिकेने या १४ प्रकरणां व्यतिरीक्त इतर अनेक ठिकाणीही जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबंधीताकडून अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे विकसीत केलेली आहेत. त्याबाबतही मोबदला देणेबाबत विकास नियंत्रण नियमावली मध्ये फेरबदलाचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

मा.महापालिका ठराव क्र. ८४८ दि. २१/४/२०१० नुसार " टीडीआर बाबतचे दि. ३/२/२००७ चे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिके बरोबर केलेल्या लेखी करार असल्यास करारचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारीत मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून

म्हणजेच दि. १८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात आलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफएसआय/टीडीआर च्या स्वरुपात देणेकामी व त्या प्रमाणे प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी म.प्रा.व न.र.अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे." मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रसिध्द केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. सदर फेरबदलामध्ये प्रामुख्याने

१) नियम क्र. एन २.३ मध्ये विकास योजनेमधील नविन रस्ता अथवा रस्तारुंदीसाठी एफएसआय देय राहील (for road widening or constructing new roads) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागाताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधित जागेचा मोबदला एफएसआय स्वरुपात देय राहील. व

२) नियम क्र एन २.४.३ मध्ये विकास योजने मधील आरक्षण, रस्ता अथवा रस्तारुंदी विकसीत झालेली नाही अशा जागांसाठी टीडीआर अनुज्ञेय राहील (Development Rights DRs is available only in case where development of a reservation has not been implemented) असे नमुद असल्याने विकास योजनेमधील रस्ता अथवा रस्तारुंदीने बाधित जागा रितसर जागा ताब्यात न घेता १८ सप्टेंबर १९९५ नंतर (सुधारीत विकास योजनेस मंजूरी ची तारीख) मनपाने रस्ता विकसीत केला आहे असा बाधीत जागेचा मोबदला टीडीआर स्वरुपात देय राहील.

असे प्रस्तावित आहे.

सदर फेरबदल महाराष्ट्र राजपत्र १ जुलै २०१० मध्ये व वृत्तपत्र दै.लोकमत व दै.पुढारी मध्ये दि. १ जुलै २०१० रोजी प्रसिध्दी देण्यात आली त्यावर प्राप्त हरकती व सुचनां वर सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्राय तयार करण्यात आला आहे.

याबाबत प्रशासनाचे मत पुढील प्रमाणे आहे.

प्रारुप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर सदर विकास योजना नकाशात जे रस्ते विकसीत झालेले (अस्तीत्वातील रस्ते) काळया रंगाने दर्शविलेले आहेत त्या व्यतिरीक्त जे रस्ते आहेत ते प्रस्तावित रस्ते व रस्ता रुंदी लाल रंगाने दर्शविलेले आहेत.

वरील बाबींचा विचार विकास योजना आराखडयात दर्शविलेले आरक्षण व रस्त्यांपैकी काही ठिकाणी संबंधीत जमीन मालकांकडून, त्यांचे हितसंबधीताकडून

अथवा कुलमुखत्यार यांचे मौखीक अथवा लेखी संमतीने (बक्षिसपत्र व विनामोबदला करारनामा वगळून) विकास कामे व रस्त्याची कामे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेली आहेत. मात्र सदर जागेच्या ताब्यासंबंधी कोणताही दस्तऐवजी करण्यात आलेला नाही.

अशा प्रकरणी

अ) सदर रस्ता, रस्तारुंदी व आरक्षण दि. १६/१२/१९९९ नंतर म्हणजेच विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआरची तरतूद समाविष्ट झाली त्यानंतर विकसीत झाले असल्यास अशा जमीनीचा मोबदला टीडीआर स्वरुपात अदा करता येईल.

महानगरपालिकेने सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. एन २.३ व एन २.४.३ मध्ये कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित केलेला आहे. त्यावर हरकती सुचनांबाबत सुनावणी झालेली आहे. सदर हरकती सुचनांचा अहवाल व त्यावर महापालिकेचा अभिप्रायानुसार आवश्यक दुरुस्त्या व वरील अ प्रमाणे विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन शासन मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे मान्यतेस ठेवणेत यावा, असा मा.आयुक्त यांजकडील प्रस्ताव आहे त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, या विषयावर चर्चा करु द्यावी.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, हा विषय मोठा आहे त्यामुळे हा विषय तहकूब करावा.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, हा नियम बदलण्याचा विषय आणलेला आहे. विषयाला विरोध नाही परंतु त्या संदर्भात हरकती सूचना आलेल्या होत्या त्यासहीत डॉकेट पाठवावे. पुढच्या वेळेस विषय चर्चेला घ्यावा, आमचा विषयाला विरोध नाही.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, थोडा अभ्यास केलातर विषय चांगला समजेल. आता थोडी चर्चा झाली पाहिजे. कारण विषयाला उशिर झालेला आहे. शेतक-यांचा अतीशय फायदा होणारा विषय आहे. दोन-तीन वर्षे झाले मंजूर होत नाही. आता यावर चर्चा केली पाहिजे. शेतक-यानी दहा-पंधरा वर्षापुर्वी प्लॉट पाडलेले आहेत. रस्त्याची जागा राहिलेली आहे ती अजूनही त्यांच्याच नावावर आहे, त्या जागेचा मोबदला मिळत नाही. नॉन डीपी आणि डीपी मधील रस्ते आहेत फक्त डीपीचा उल्लेख केलेला आहे त्यात नॉन डीपीचा उल्लेख केलातर ख-या अर्थाने शेतक-यांना एफएसआय मिळणार आहे. ज्या जागेचे ॲवॉर्ड होतात ते १५ ते २० टक्के शेतक-यांना समजते. ८० टक्के लोकांना माहिती नसते. ॲवॉर्ड

झाल्यानंतर शेतक-यांना पैसे घ्यायचे नसतीलतर एफएसआय, टिडीआर घ्यायचा असेलतर तो मिळाला पाहिजे. या विषयाला माझी उपसूचना राहणार आहे.

मा.श्रीरंग बारणे:- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ३८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २०.४.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/ड-१/७०/२०१२ दि.१६/४/२०१२

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-९० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ६५८ /१२
दिनांक :- ३० / ०४ /२०१२

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.